## —: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :—

क्रमांक/नापोआ/नाशिक मॅरेथॉन/अधिसुचना/ 339 /२०१९, नाशिक दिनांक २२/०२/२०१९

ज्या अर्थी, **दिनांक २४/०२/२०१९** रोजी नाशिक—त्रंबक या मार्गावर **नाशिक मॅरेथॉन २०१९ पहाटे ०५.०० वा.** होणार असल्याने सदर मार्गावर वाहतूकीची कोंडी होवू नये व खबरदारीची उपाययोजना म्हणून वाहतूक मार्गात बदल करणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी मी लक्ष्मीकांत पाटील, पोलीस उप आयुक्त, (वाहतुक) नाशिक शहर महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एम.व्ही.ए—११६/सीआर/३७/टी आर दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसूचने नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून वाहतुकीची कोंडी होवु नये म्हणुन आम जनतेच्या सोईसाठी खालील प्रमाणे निर्बंध जारी करीत आहे.

दिनांक २४/०२/२०१९ रोजी **नाशिक मॅरेथॉन २०१९** या निमीत्ताने खालील नमुद मार्गावरील वाहतुक **पहाटे ०४.०० ते मॅरेथॉन संपे पावेतो** वाहतुकीसाठी **बंद** राहील.

**१) ३ कि.मी. मार्ग :—** गोल्फ क्लब—त्रंबक नाका सिग्नल—सी.बी.एस. सिग्नल—अशोक स्तंभ—के.टी.एच.एम. कॉलेज समोरून उडडाण पुलाचे बाजुने खालुन डावीकडे—ठाकरे बंगला—टिळकवाडी सिग्नल—जलतरण सिग्नल डाव्या बाजुने सिव्हील हॉस्पीटल जवळ.

**२) ५ कि.मी. मार्ग :—** गोल्फ क्लब—त्रंबक नाका सिग्नल—सी.बी.एस. सिग्नल—अशोक स्तंभ—के.टी.एच.एम. कॉलेज समोरील उडडाणपुलावरून—जुना गंगापुर नाका—कॅनडा कॉर्नर—जुना सी.टी.बी. सिग्नल—भवानी सर्कल डाव्या बाजुने सिव्हील हॉस्पीटल जवळ.

**३) १० कि.मी. मार्ग :—** गोल्फ क्लब—त्रंबक नाका सिग्नल—सी.बी.एस. सिग्नल—अशोक स्तंभ—के.टी.एच.एम. कॉलेज समोरील उडडाणपुलावरून—जुना गंगापुर नाका—जेहान सर्कल—महात्मानगर—एबीबी सर्कल—आय.टी. आय.सिग्नल—परत त्याच मार्गे एबीबी सर्कल, जुना सी.टी.बी. सिग्नल—भवानी सर्कल उजव्या बाजुने गोल्फ क्लब.

**४) २१ कि.मी. मार्ग :—** गोल्फ क्लब—त्रंबक नाका सिग्नल—सी.बी.एस. सिग्नल—अशोक स्तंभ—के.टी.एच.एम. कॉलेज समोरील उडडाणपुलावरून—जुना गंगापुर नाका— जेहान सर्कल—महात्मानगर—एबीबी सर्कल—आय.टी. आय.सिग्नल—पपाया नर्सरी—पिंपळगांव बहुला—परत त्रंबक रोडने जुना सी.टी.बी. सिग्नल—भवानी सर्कल उजव्या बाजुने गोल्फ क्लब.

**५) ४२ कि.मी. मार्ग :—** गोल्फ क्लब—त्रंबक नाका सिग्नल—सी.बी.एस. सिग्नल—अशोक स्तंभ—के.टी.एच.एम. कॉलेज समोरील उडडाणपुलावरून—जुना गंगापुर नाका— जेहान सर्कल—महात्मानगर—एबीबी सर्कल—आय.टी. आय.सिग्नल पपाया नर्सरी—पिंपळगांव बहुला—हॉटेल संस्कृती शुभम वॉटर पार्क —त्रंबक रोडने परत त्याच मार्गाने ए.बी.बी.सिग्नल—हॉटेल सिंबल समोरून जुना सी.टी.बी. सिग्नल—भवानी सर्कल उजव्या बाजुने गोल्फ क्लब.

**स्पर्धकांसाठी धावण्याचा मार्ग हा गोल्फ क्लब—त्रंबक नाका सिग्नल—सी.बी.एस. सिग्नल—अशोक स्तंभ—जेहान सर्कल—एबीबी सर्कल या मार्गावर रस्त्यांच्या डाव्या बाजुने व एबीबी सर्कलपासून ते हॉटेल संस्कृतीपर्यंत रस्त्यांच्या उजव्या बाजुने (त्रंबक बाजुकडुन ते नाशिककडे येणाऱ्या लेनवर) असेल.**

**दिनांक २४/०२/२०१९ रोजी नाशिक मॅरेथॉन २०१९ निमीत्ताने वरील सर्व मार्गावरील वाहतूक पहाटे ०४:०० ते मॅरेथॉन संपे पावेतो वाहतूकीसाठी बंद राहील. नमुद मार्गावरील जाणारी सर्व प्रकारची वाहने खालील दिलेल्या पर्यायी मार्गाचा पहाटे ०४:०० ते मॅरेथॉन संपे पावेतो वापर करतील.**

१) भवानी सर्कल (मायको सर्कल) ते त्रंबक नाका (मोडक सिग्नल) या मार्गावरील वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात आली असून नागरिकांनी गडकरी सिग्नल ते चांडक सर्कल ते मायको सर्कल या पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

पान नं २ वर......

Scanned by CamScanner

२) त्रंबक नाका (मोडक सिग्नल) ते अशोक स्तंभ ते जेहान सर्कल ते ए.बी.बी. सर्कल कडे जाणाऱ्या रस्त्यांच्या डाव्या बाजुकडील लेनवर नाशिक मॅरेथॉनचे स्पर्धक धावणार असल्याने सदरची लेन वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद असणार आहे. **त्याकाळात नागरिकांनी वरील रस्त्यांच्या उजव्या लेनवर स्मार्ट रोडचे काम चालु असल्याने इतर पर्यायी मार्गाचा वापर करावयाचा आहे.**

३) ए.बी.बी. सर्कल ते पपया नर्सरी ते हॉटेल संस्कृतीकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या डाव्या बाजुचा वापर हा येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांनी करावयाचा आहे. हॉटेल संस्कृती ते पपाया नर्सरी ते एबीबी सर्कल ते सिब्बल हॉटेल ते भवानी सर्कल ते गोल्फ क्लबकडे येणाऱ्या डाव्या बाजुकडील लेनवर नाशिक मॅरेथॉनचे स्पर्धक धावणार असल्याने सदरची लेन वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद असणार आहे.

४) नाशिककडून त्रंबककडे जाणारी वाहतूक मोडक सिग्नल–गडकरी सिग्नल–चांडक सर्कल–मायको सर्कल–एबीबी सर्कल–पपया नर्सरी–संस्कृती हॉटेल या मार्गावरून त्रंबककडे जातील. वरील नमुद सर्व मार्ग ओलांडण्यासाठी टप्प्या टप्प्याने वाहतूक सोडण्यात येईल.

५) के.टी.एच.एम. कॉलेज समोरील बोगदा ते सिध्दीविनायक हॉस्पीटल ते टिळकवाडी सिग्नल ते जलतरण सिग्नल या मार्गाने ३ कि.मी. नाशिक मॅरेथॉनचे स्पर्धक धावणार असल्याने सदरचा मार्ग हा वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद असणार आहे.

६) जुना गंगापुर नाका ते कॅनडा कॉर्नर ते जुना सि.टी.बी. सिग्नल ते मायको सर्कल या मार्गाच्या डाव्या लेनवरून ५ कि.मी. नाशिक मॅरेथॉनचे स्पर्धक धावणार असल्याने सदरचा मार्ग हा वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद असणार आहे. **नागरिकांनी सदर रस्त्यांच्या उजव्या बाजुचा वापर हा येणाऱ्या व जाणाऱ्या दोन्हीबाजुकडील वाहतुकीसाठी करावयाचा आहे.**

**वरील सर्व प्रकारचे निर्बंध हे पोलीस सेवेतील वाहने, रूग्णवाहीका, शववाहीका व अग्निशमन दलाची वाहने यांना लागु राहणार नाही.**

वरील निर्बंध हे **दिनांक २४/०२/२०१९ रोजी पहाटे ०४:०० ते मॅरेथॉन संपे पावेतो** अंमलात राहतील. तसेच, वरील मार्गात व वेळे मध्ये परिस्थितीनुरुप बदल करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आले आहे.

सदरची अधिसुचना ही माझे सही व शिक्यानिशी दिनांक २१/०२/२०१९ रोजी निर्गमित करीत आहे.

स्थळ :– नाशिक शहर
दिनांक :– २१/०२/२०१९

पोलीस आयुक्त नाशिक शहर

**स्वाक्षरीत.**
**(लक्ष्मीकांत पाटील)**
पोलीस उप आयुक्त, (वाहतुक),नाशिक शहर

**प्रति,**

व्यवस्थापक, येरवडा कारगृह मुद्रणालय, पुणे –०६.
२/– आपणास विनंती करण्यात येते की, सदरची अधिसुचनेची प्रसिध्दी पुढील राजपत्रात करावी.

**प्रत सस्नेह अग्रेषित :–** १) आयुक्त, म.न.पा., नाशिक २) जिल्हाधिकारी, नाशिक.
**प्रत :–** १) प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक. २) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी नाशिक.
**प्रत माहितीसाठी :–** सर्व पोलीस उप आयुक्त, सर्व सहा. पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी/शाखा, पोलीस आयुक्तालय नाशिक शहर.

Scanned by CamScanner